# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण बृहन्मुंबई

परिपत्रक क्र. 220

जा.क्र.झोपुप्रा/वित्त/डिफरमेंट/परि./2024/38 LCU

दिनांकः 02 JUL 2024

विषय: **शासनास व इतर नियोजन प्राधिकरणास भरणा करण्यात यावयाच्या विविध अधिमूल्यामध्ये हप्त्याची सवलत मिळणेबाबत.**

संदर्भ: 1) प्रमुख अभियंता (वि.नि.), बृहन्मुंबई महानगर पालिका यांचे पत्र क्र.CHE/DP/9152/Gen. दि.02.05.2023

2) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र.टिपीबी-4319/प्र.क्र.156/2019/ नवि-11, दि.03.05.2023

3) झोपुप्राचे पत्र क्र.झोपुप्रा/विनि/अधिमूल्य हप्ते/27338/2024 दि.24.05.2024

4) महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.175/झोपसु-1 दि.24.06.2024

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून विकास नियंत्रण प्रोत्साहन व नियमावली-2034 मधील विनियम 33(10) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस परवानगी देणे, योजनेस सनियंत्रण इत्यादी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून करण्यात येते. विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास देय अधिमुल्याची रक्कम हप्त्याने भरणा करण्यासाठी परिपत्रक क्र.185, दि.03.04.2018 व फंजीबल क्षेत्राचे अधिमूल्याचा हप्त्याने भरणा करण्यासाठी परिपत्रक क्र.186, दि.03.04.2018 अन्वये सवलत देण्यात आलेली आहे.

याबाबत बृहन्मुंबई महानगर पालिकेने पत्र क्र.CHE/DP/9152/Gen. दि.02.05.2023 अन्वये विकास परवानगी देताना आवश्यक असलेले अधिमूल्य भरण्याकरिता महानगरपालिकेकडील दि.17.09.2019 रोजीच्या परिपत्रकातील नमूद अटी व तरतुदीस अधिन राहून दि.03.09.2025 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तदनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र.टिपीबी-4319/प्र.क्र.156/2019/नवि-11 दि.03.05.2023 अन्वये बृहनमुंबई महानगर पालिकेच्या मार्गदर्शन तत्वाप्रमाणे धारावी पुनर्वसन प्रकल्प, महाराष्ट्र राज्य व रस्ते विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, म्हाडा यांना देय असलेल्या अधिमूल्याची हप्त्याने व्याजासह वसुली करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुषंगाने महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय यांनी क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.175/झोपसु-1 दि.24.06.2024 रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार शासनास व इतर नियोजन प्राधिकरणास देय असलेल्या अधिमूल्याची रक्कम भरण्यास लागू केलेल्या सवलतीस नगर विकास विभागाच्या दि.03.05.2023 रोजीच्या पत्रान्वये दि.03.09.2025 पर्यंत दिलेली मुदतवाढ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गतच्या प्रकल्पांना लागू करण्यास तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दि.17.09.2019 रोजीच्या परिपत्रकातील नमूद अटी व तरतुदीनुसार अधिमूल्यांच्या हप्त्यांच्या रकमांवर 8.5% प्रतिवर्ष व्याज आकारणी करून हप्ते वसूल करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार खालील तक्त्यात नमुद तपशीलाप्रमाणे अधिमुल्य रकमेचे हप्ते वसूल करण्यात येतील.

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६५६ ५८००, २२६९१२५८००/ १८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल : info@sra.gov.in

(अ) 70 मीटर पर्यंतची प्रस्तावित उंची असलेल्या इमारतीसाठी देय अधिमूल्याचे हप्ते

| Initial Payment | At the end of Month with interest | | | |
|---|---|---|---|---|
| | 12th | 24th | 36th | 48th |
| 1st Instalment | 2nd Instalment | 3rd Instalment | 4th Instalment | 5th Instalment |
| 10% | 22.5% | 22.5% | 22.5% | 22.5% |

(ब) 70 मीटर किंवा त्यापेक्षा जास्त उंची प्रस्तावित असलेल्या इमारतीसाठी देय अधिमूल्याचे हप्ते

| Initial Payment | At the end of Month with interest | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 12th | 24th | 36th | 48th | 60th |
| 1st Instalment | 2nd Instalment | 3rd Instalment | 4th Instalment | 5th Instalment | 6th Instalment |
| 10% | 18% | 18% | 18% | 18% | 18% |

गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र.झोपुयो-2008/प्र.क्र.236/झोपसु-1 दि.07.02.2024 नुसार सार्वजनिक मालकीच्या जागेवरील झोपडयांचा पुनर्विकास करतांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत वसूल करावयाच्या जमिन अधिमूल्यांचे हप्ते 10 : 10 : 80 अशा प्रमाणात निश्चित केलेल्या दरानुसार ज्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनासाठी सवलतीचा लाभ घेतला असेल त्या योजनांना हे परिपत्रक लागू नसेल.

सदर परिपत्रक Labour Cess व MRTP Development Charges या लेखाशिर्षाखालील रकमेसाठी लागू असणार नाही.

विविध अधिमूल्यांकरिता यापूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.185 व क्र.186, दि.03.04.2018 नुसार डिफरमेंट सुविधेचा लाभ मंजूर केला असेल तर त्या योजनांना या परिपत्रकातील तरतुदीनुसार लाभ मिळणार नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.185 व 186, दि.03.04.2018 मधील तरतुदीप्रमाणे सदर परिपत्रकानुसार डिफरमेंट सुविधेचा लाभ रू.5 लाख रकमेपेक्षा जास्त रकमेसाठी देय असेल.

हप्त्याची रक्कम देय दिनांकास भरणा न केल्यास झोपुप्राचे परिपत्रक क्र.185 व 186 दि.03.04.2018 मधील तरतुदीनुसार दंडात्मक व्याज प्रतिवर्ष @18% चक्रवाढ दराने आकारण्यात येईल.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी परिपत्रकाच्या दिनांकापासून ते दि.03.09.2025 पर्यंत करण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई.

प्रत:
1) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी/झोपुप्रा, बृहन्मुंबई यांचे स्विय सहाय्यक
2) सचिव/झोपुप्रा, बृहन्मुंबई यांचे स्विय सहाय्यक
3) उपमुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग/झोपुप्रा, बृहन्मुंबई
4) सर्व कार्यकारी अभियंता/झोपुप्रा, बृहन्मुंबई
5) नस्ती